# ६२ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा

### अहमदनगर केंद्रातून ‘नाना थोडं थांबा ना !’ प्रथम

---

**मुंबई, दि. ११ डिसेंबर** : ६२ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत अहमदनगर केंद्रातून **रंगकर्मी प्रतिष्ठान, अहमदनगर** या संस्थेच्या **नाना थोडं थांबा ना !** या नाटकाला प्रथम पारितोषिक तसेच **सप्तरंग थिएटर्स, अहमदनगर** या संस्थेच्या **अश्वदा** या नाटकास द्वितीय पारितोषिक जाहीर झाल्याची घोषणा सांस्कृतिक कार्य संचालक श्री. बिभीषण चवरे यांनी आज एका प्रसिध्दीपत्रकाद्वारे केली आहे. या दोन्ही नाटकांची अंतिम फेरीसाठीही निवड करण्यात आली आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे आयोजित या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचे **अहमदनगर** केंद्रावरील अन्य निकाल पुढीलप्रमाणे-

**नाट्य आराधना, अहमदनगर** या संस्थेच्या **सुखांशी भांडतो आम्ही** या नाटकासाठी तृतीय पारितोषिक प्राप्त झाले आहे. **दिग्दर्शन**: प्रथम पारितोषिक डॉ. शाम शिंदे (नाटक- अश्वदा), द्वितीय पारितोषिक प्रद्युम्न गायकवाड (नाटक- नाना थोडं थांबा ना !), **प्रकाश योजना** प्रथम पारितोषिक प्रतिभा शिंदे (नाटक- हायब्रीड), द्वितीय पारितोषिक गणेश लिमकर (नाटक- सुखांशी भांडतो आम्ही), **नेपथ्य** : प्रथम पारितोषिक समीर कुलकर्णी (नाटक-अश्वदा) द्वितीय पारितोषिक प्रशांत कायभासे (नाटक- नाना थोडं थांबा ना !), **रंगभूषा** : प्रथम पारितोषिक चंद्रकांत सैंदाणे (नाटक- अश्वदा), द्वितीय पारितोषिक सोहम सैंदाणे (नाटक- पुनरुत्थान) **उत्कृष्ट अभिनय रौप्यपदक** तेजस अतितकर (नाटक-सुखांशी भांडतो आम्ही) व रेणुका सुर्यवंशी (नाटक- कॉटेज नं.५४), **अभिनयासाठी गुणवत्ता प्रमाणपत्रे** श्वेता पारखे (नाटक- नाना थोडं थांबा ना !), सिध्दी कुलकर्णी (नाटक-पंडिता), आकांक्षा शिंदे (नाटक-अश्वदा), प्रज्वला कासलीवाल (नाटक- सुखांशी भांडतो आम्ही), स्वानंदी भरताळ (नाटक-पहाट पक्षी), कान्हा तिवारी (नाटक-नाना थोडं थांबा ना!), श्रेणीक शिंगवी (नाटक-वारुळ), आदीत्य नगरकर (नाटक-परीघ), प्रसाद बेडेकर (नाटक-कॉटेज नं.५४) अमित खताळ (नाटक-हायब्रीड)

दि. २० नोव्हेंबर २०२३ ते ०६ डिसेंबर २०२३ या कालावधीत माऊली सभागृह, अहमदनगर येथे अतिशय जल्लोषात झालेल्या या स्पर्धेत एकूण १६ नाट्यप्रयोग सादर करण्यात आले. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून श्री. संजय पेंडसे, श्री. सुहास देशपांडे आणि श्रीमती आसावरी शेट्ये यांनी काम पाहिले.

सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव श्री. विकास खारगे यांनी विजेत्यांचे अभिनंदन केलेले आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी प्रथम व द्वितीय आलेल्या नाटकाच्या संघाचे तसेच इतर पारितोषिक प्राप्त कलाकारांचे अभिनंदन केले असून भविष्यातही या संघांनी व कलाकारांनी सर्वोत्तम कामगिरी करावी, अशी अपेक्षा व्यक्त केलेली आहे.

⊗⊗⊗